R.No. MHHMAR/25/A3029

दैनिक

E-mail : dainikmhavratt@gmail.com

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : २७

दि. ०६ जानेवारी २०२६, वार : मंगळवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

# महावृत्त

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

# प्रभाग सातमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस- रिपब्लिकन सेना युतीच्या उमेदवारांची जंगी प्रचार रॅली, प्रभागातील समस्याची जबाबदारी आमची : आ. संजय बनसोडे

लातूर : लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीच्या रणधुमाळीला जोरदार सुरुवात झालेली आहे. प्रभाग सात मधील राष्ट्रवादी काँग्रेस -रिपब्लिकन सेना युतीचे अधिकृत उमेदवार सचिन मस्के, कु. एश्वर्या चिकटे व अब्दुल गफार रज्जाक मानियार यांच्या प्रचारार्थ आज रविवारी सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून भव्य रॅली काढण्यात आली. बोद्धनगर, यशवंत शाळा, विलासनगर, ६० फुटी रोड, अन्सार नगर, सिद्धार्थ हौसिंग सोसायटी, स्वातंत्र्य सैनिक कॉलनी, लूंबिनी बुद्ध विहार मार्गे वैशाली बुद्ध विहार येथे आली. या रॅलीत हजारोच्या संख्येने नागरिक, तरुण, महिला, पुरुष सहभागी होते. विशेष म्हणजे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, शिक्षक आमदार विक्रम काळे, आ. संजय बनसोडे,राष्ट्रवादीचे लातूर जिल्हाध्यक्ष मकरंद



सावे, ऍड. व्यंकट बेद्रे, बौद्धाचार्य केशव कांबळे, रिपब्लिकन सेनेचे राज्य सचिव प्रा. युवराज धसवाडीकर, सुशीलकुमार चिकटे, विनोद खटकें हे सहभागी झाले होते. वैशाली बुद्ध विहार येथे या रॅलीचे रूपांतर सभेत झाले. यावेळी माजी मंत्री आ. संजय बनसोडे म्हणाले, राष्ट्रवादी काँग्रेसचे लातूर जिल्ह्यातील मंत्री, आमदार मिळून आपल्या नागरी समस्या सोडवण्याची जबाबदारी घेऊ. आम्ही तुमच्या पाठीशी खंबीर उभे आहोत. त्यामुळे येत्या १५ जानेवारीला घड्याळ चिन्हसमोरील बटन दाबून उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करा. तसेचउमेदवार सचिन मस्के, एश्वर्या चिकटे, अब्दुल गफार रज्जाक मणियार यांनी आपल्या भाषणात प्रभागाच्या विकासाठी कटीबद्ध असून ही जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडण्याचे आश्वासन दिले. लंडन येथील ज्या कॉलेजात डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिकले, त्याच कॉलेजातून अर्थशास्त्र ची पदवी घेऊन आलेल्या उमेदवार एश्वर्या चिकटे म्हणाल्या, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची प्रेरणा घेऊन आपण राजकारणात उतरलो आहोत. नगरसेवक हे पद जबाबदारीचे पद आहे. लातूरला लंडनसारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची माझी इच्छा आहे. या प्रसंगी प्रा. युवराज धसवाडीकर, विनोद खटकें, ऍड. व्यंकट बेद्रे, केशव कांबळे यांची भाषणे झाली.




६० फुटी रोडवर उमेदवार आणि नेत्यांवर सात जेसीबीतून पुष्पवृष्टी सदर रॅली दरम्यान श्री सिद्धेश्वर मंदिराकडे जाणाऱ्या ६० फुटी रोडवर शहीद अहमद खान पठाण कृती समितीच्या वतीने सात जेसीबीतून राष्ट्रवादी काँग्रेस -रिपब्लिकन सेना युतीचे उमेदवार व राष्ट्रवादीचे मंत्री बाबासाहेब पाटील, आ. विक्रम काळे, आ. संजय बनसोडे यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली.

रिपाई आठवले गट व शहीद अहमद खान कृती समितीचा उमेदरांना जाहीर पाठिंबा रिपाई आठवले गटाचे अध्यक्ष जितेंद्र बनसोडे, प्रसेनजीत सरवदे यांनी राष्ट्रवादी व रिपब्लिकन सेनेच्या उमेदवारांना जाहीर पाठिंबा दिला. तसेच तसेच काँग्रेच्या अयोध्या उपाध्ये, अतिश काळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आ. संजय बनसोडे यांच्या उपस्थितीत जाहीर प्रवेश केला.

# श्री व्यंकटेश माध्यमिक विद्यालयातील २३ शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता रद्द : मिलिंद कांबळे

लातूर : येथील श्री व्यंकटेश शिक्षण संस्थाद्वारा संचलित श्री व्यंकटेश माध्यमिक विद्यालयातील २३ शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या बोगस वैयक्तिक मान्यता रद्द करण्याचा तसेच उच्च माध्यमिकच्या ५ शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव विभागीय शिक्षण उपसंचालक डॉ. दत्तात्रय मठपती यांनी विभागीय शिक्षण मंडळाच्या अध्यक्षांकडे पाठवला असल्याची माहिती मराठवाडा प्रदेश निराधार संघटनेचे अध्यक्ष मिलिंद कांबळे यांनी सोमवारी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

श्री व्यंकटेश शिक्षण संस्थेवर सन १९९७ पासून ते आजतागायत अधिकृत कार्यकारी मंडळ अस्तित्वात नसतानाही संस्थेचे अध्यक्ष सुरेंद्र ब्रिजमोहन अग्रवाल व सचिव प्रशांत शिवप्पा पटणे यांनी तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांशी संगनमत करून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची भरती करून कोट्यवधी रुपयांचा आर्थिक व्यवहार करून शासनाची फसवणूक केल्याचा आरोपही मिलिंद कांबळे यांनी यावेळी केला. या शिक्षण संस्थेतील स्वयंघोषित पदाधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराविरुद्ध आपण वेळोवेळी आवाज उठवला असून सातत्याने हा विषय शिक्षण विभागाकडे लावून धरला आहे. आपल्या संपूर्ण पुराव्यानिशी दाखल केलेल्या तक्रारीची शहनिशा करून विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयाने या प्रकरणाची



सुनावणी दि. १७ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजता घेतली. या सुनावणीस संस्थेचे स्वयंघोषित अध्यक्ष - सचिव यांसह ज्यांच्या नेमणुकीविषयी तक्रार करण्यात आली आहे ते सर्व कर्मचारी, शिक्षण उपसंचालक कार्यालयातील सहाय्यक शिक्षण संचालक तथा अन्य अधिकारी उपस्थित होते. या सुनावणीचा निर्णय दि. २९ डिसेंबर २०२५ रोजी देण्यात आला.

श्री व्यंकटेश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील बोगस शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचारी भरती प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांकडे दि. १२ डिसेंबर २०२२ रोजी एका तक्रार अर्जाद्वारे करण्यात आली होती. संबंधित विद्यालयातील या कर्मचाऱ्यांची वैयक्तिक मान्यता दि. २३ ऑगस्ट २०१७ च्या शासन परिपत्रकान्वये रद्द करण्यात याव्यात अशी मागणी लावून धरली होती. तसेच विद्यमान अध्यक्ष - सचिवांना संस्थेत कोणत्याही पदावरील कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याचे अधिकार नसतानाही त्यांनी दिलेल्या वरील नियुक्त्या नियमबाह्य असल्याने त्या तात्काळ रद्द करण्यात याव्यात, अशीही मागणी केली होती.

शिक्षण उपसंचालकांच्या सुनावणीत २३ शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला, तर उच्च माध्यमिकच्या पाच शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता रद्द करण्याचा प्रस्ताव विभागीय शिक्षण मंडळाच्या अध्यक्षांकडे पाठवण्यात आला आहे. या बोगस कर्मचारी भरती प्रकरणी अध्यक्ष सुरेंद्र अग्रवाल, सचिव प्रशांत पटणे ,शालेय समितीचे अध्यक्ष तथा तत्कालीन मुख्याध्यापक सी.व्ही. मेटे, समितीचे सचिव व तत्कालीन माध्यमिक शिक्षणाधिकारी यांनी शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी या सर्वांवर एसआयटीने पुराव्याच्या आधारे गुन्हे दाखल करावेत. या सर्व शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकडून आतापर्यंत उचलेले वेतन वसूल करून ते शासनाच्या तिजोरीत जमा करण्यात यावे, अशी मागणीही आपण लावून धरल्याचे मिलिंद कांबळे यांनी सांगितले.

## सुनावणीच्या निर्णयास स्थगिती : डॉ. मठपती

श्री व्यंकटेश विद्यालयातील २३ शिक्षक -शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक मान्यता रद्द करण्याचा निर्णय घेतलेला निर्णय आणि उच्च माध्यमिक स्तरावरील ५ शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता रद्द करण्याचा प्रस्तावाविभागीय शिक्षण मंडळाच्या अध्यक्षांकडे पाठवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, संबंधित शिक्षकांनी दि. १८ डिसेंबर रोजी तक्रारीच्या प्रतिची मागणी केली. असल्याने त्यांना दि. ३१ डिसेंबर रोजी तक्रारीची प्रत उपलब्ध करून देण्यात आली आली. प्रत दिल्यानंतर शिक्षकांना त्यावर अभिप्राय सादर करण्यास कळविण्यात आले आहे. शिक्षकांना तक्रारीच्या अनुषंगाने अभिप्राय सादर करता यावा व याचिका क्रं . ५२५०/ २०२५ मधील निर्णय अद्याप प्रलंबित असल्यामुळे तूर्तास दि. २९ डिसेंबरच्या २८ शिक्षक -शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मान्यता रद्द करण्याचा घेतलेला निर्णय पुनर्विचार करण्याबाबत शिक्षकांनी दि. ३० डिसेंबर रोजी दिलेल्या विनंती अर्जानुसार तसेच न्यायालयात शिक्षकांची याचिका प्रलंबित असल्यामुळे दि. २९ डिसेंबर २०२५ रोजीचा निर्णय तूर्तास स्थगित करण्यात येत असल्याची माहिती शिक्षण उपसंचालक डॉ. दत्तात्रय मठपती यांनी दिली.

# केतसारणी येथे कापूस प्रक्षेत्र दिन व सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात

केज/प्रतिनिधी-केज तालुक्यातील



केकतसारणी येथे शनिवार, दि. ०३ जानेवारी २०२६ रोजी कृषि विज्ञान केंद्र, डिघोळअंबा (अंबाजोगाई) यांच्या वतीने कापूस शेती दिन तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. भारतीय कृषी अनुसंधान परिषद अंतर्गत केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या विशेष कापूस प्रकल्पांतर्गत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केकतसारणी गावच्या सरपंच अनिता पंडित सावंत होत्या. यावेळी कृषि विज्ञान केंद्र, अंबाजोगाई येथील शास्त्रज्ञ नरेंद्र जोशी (उद्यानविद्या), कृष्णा कर्डीले (कृषिविद्या), सुहास पंके (कृषि विस्तार) यांच्यासह बळीराम वीर (राशी सिड्स), प्रगतशील शेतकरी, महिला शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या कार्यक्रमात सघन लागवड पद्धतीने (कञ्झड) कापूस लागवडी बाबत माहिती देण्यात आली. मार्गदर्शन करताना शास्त्रज्ञ कृष्णा कर्डीले यांनी कापूस पिकातील गळ फांदी छाटणीचे महत्व, सघन लागवड पद्धतीचे फायदे, योग्य मशागत, सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास उत्पादनात होणारी वाढ याविषयी सविस्तर माहिती दिली. शेतीकडे व्यवसाय म्हणून पाहण्याची गरज असून धाग्याच्या गुणवत्तेनुसार कापसाला योग्य दर मिळण्यासाठी शेतकऱ्यांनी सुधारित तंत्रज्ञान अवलंबवावे. तसेच 'एक गाव एक वाण एक तंत्रज्ञान' ही संकल्पना स्वीकारल्यास शेतकऱ्यांचा आर्थिक लाभ होईल, असे त्यांनी सांगितले.

सुहास पंके यांनी केंद्र सरकारच्या ऋठच् ऋयोजनेसह विविध शासकीय योजनांची माहिती दिली. याचबरोबर सावित्रीबाई फुले यांनी स्त्री शिक्षणासाठी केलेले कार्य अधोरेखित करत, महिलांनी शिक्षण, शेती व उद्योजकतेत पुढे येण्याचे आवाहन केले. सावित्रीबाई फुले यांनी महिलांना आत्मनिर्भर बनवण्याचा जो विचार मांडला, तो आजच्या आधुनिक शेतीसाठी अत्यंत महत्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. महिलांचा शेतीतील सहभाग वाढल्यास कुटुंबाची व गावाची आर्थिक प्रगती वेगाने साध्य होऊ शकते, असे त्यांनी स्पष्ट केले.

नरेंद्र जोशी यांनी फळबाग व्यवस्थापन, अद्रक पिकातील मर रोग व त्यावरील उपाययोजना, अन्नद्रव्य व खत व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले. बळीराम वीर यांनी कापूस पिकासाठी प्लांटरद्वारे पेरणी, यंत्राद्वारे वेचणी, योग्य वाणांची निवड तसेच कोरडवाहू भागात प्लांटरद्वारे लागवडीचे महत्त्व विषद केले.

कार्यक्रमात शेतकरी व महिला शेतकऱ्यांनी सघन लागवड पद्धतीने मिळालेल्या उत्पादनवाढीचे अनुभव सांगितले. सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त महिलांनी शिक्षण, शेती व समाजपरिवर्तनात सक्रिय भूमिका घ्यावी, असा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुहास पंके यांनी केले, तर अध्यक्षीय समारोप अनिता सावंत यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रविंद्र अंबाड, ऋषिकेश काळे, सागर काळे तसेच ग्रामस्थांचे मोलाचे सहकार्य लाभले. प्रत्यक्ष उपयोगी व मार्गदर्शक माहिती मिळाल्याने उपस्थित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

# लातूरकरांच्या भावनांवर हल्ला; भाजपच्या विलासराव देशमुखांबद्दलच्या वक्तव्याने शहरात संतापाची लाट

लातूर / प्रतिनिधी :-भाजप प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी लातूरच्या लोकभावनांचं प्रतीक असलेल्या विलासराव देशमुख यांच्याबद्दल केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्यामुळे लातूर मध्ये तीव्र संतापजनक वातावरण निर्माण झाले आहे. भाजपच्या एका प्रचार सभे मध्ये केल्या गेलेल्या या वक्तव्याने केवळ एका नेत्याचा अपमान झालेला नसून, लातूरच्या सांस्कृतिक परंपरेवर आणि लोकांच्या भावना-संस्कारांवर थेट आघात झाल्याची तीव्र भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. लातूर हे केवळ एक शहर नाही, तर संस्कार, सभ्यता आणि लोकनेतृत्वाची परंपरा जपणारा मुलुख आहे. या परंपरेचं सर्वात मोठं प्रतीक म्हणजे विलासराव देशमुख. त्यांच्या विचारांनी, कार्याने आणि सामान्य माणसाशी असलेल्या जिव्हाळ्याच्या नात्याने लातूरकरांच्या मनात त्यांनी अढळ स्थान निर्माण केलं आहे. म्हणूनच विलासराव देशमुख हे लातूरसाठी केवळ नाव नाही, तर जिवंत भावना आहेत. येणाऱ्या महापालिकेत विलासराव देशमुखांच्या आठवणी पुसून निघतील, असे संकेत देणारे विधान लातूरकरांसाठी अत्यंत वेदनादायक ठरले आहे. विलासराव देशमुखांनी लातूरला शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा आणि आधुनिक विकासाची ओळख दिली. त्यांच्या कार्याची पुसट आठवणही पुसण्याचा विचार म्हणजे लातूरच्या इतिहासाशी बेईमानी असल्याचे मत सर्वसामान्य नागरिक व्यक्त करत आहेत. या वक्तव्यानंतर लातूरकरांसाठी ही निवडणूक आता केवळ सत्तेची लढाई राहिलेली नाही. ही लढाई आता लातूरच्या स्वाभिमानाची, प्रतिष्ठेची आणि संस्कृतीच्या रक्षणाची बनली आहे. विलासराव देशमुखांचा अपमान म्हणजे लातूरचा अपमान मानला जात असून, या मुद्द्यावर नागरिकांमध्ये अभूतपूर्व एकजूट आणि भावना दिसून येत आहेत.

## संपादकीय...

# संविधान, संवेदना आणि सत्तेची जबाबदारी.

ग्वालियरमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा फोटो जाळण्याची घटना आणि त्यानंतर चंद्रशेखर आझाद यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना लिहिलेले पत्र हे दोन्ही प्रसंग स्वतंत्र नाहीत, तर आजच्या भारतातील सामाजिक अस्वस्थतेचे परस्पर जोडलेले दुवे आहेत. ही केवळ कायदा-सुव्यवस्थेची घटना नसून, ती संविधानाच्या आत्म्यावर झालेली घाला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एका समाजाचे नव्हे, तर संपूर्ण भारताचे वैचारिक मार्गदर्शक होते. त्यांनी लिहिलेले संविधान हे केवळ कायद्यांचे पुस्तक नाही, तर शोषित, वंचित आणि दुर्बल घटकांसाठी दिलेले नैतिक संरक्षणकवच आहे. अशा महामानवाच्या प्रतिमेचा अपमान करणे म्हणजे त्या मूल्यांनाच नाकारणे होय, ज्यावर भारताची लोकशाही उभी आहे.

ग्वालियरमध्ये घडलेली ही घटना अधिकच गंभीर ठरते, कारण ती सार्वजनिक ठिकाणी, जाणीवपूर्वक आणि व्हिडिओद्वारे प्रसारित करण्यात आली. हा अपघात नव्हता; हा जाणीवपूर्वक केलेला सामाजिक भडकावा होता. अशा कृतींमागे केवळ व्यक्तिगत विकृती नसून, समाजात जातीय तेढ निर्माण करून राजकीय किंवा वैचारिक फायदा मिळवण्याचा प्रयत्न दडलेला असतो.

याच पार्श्वभूमीवर चंद्रशेखर आझाद यांनी अमित शहा यांना लिहिलेले पत्र महत्त्वाचे ठरते. हे पत्र भावनिक उद्रेक नसून, संविधानिक जबाबदारीची आठवण करून देणारा दस्तऐवज आहे. त्यांनी केंद्र सरकारला स्पष्ट शब्दांत सांगितले की, जर अशा घटनांवर कठोर कारवाई झाली नाही, तर त्याचा संदेश अत्यंत धोकादायक जाईल

संविधानाचा अपमान करणाऱ्यांना मोकळीक आहे, असा गैरसमज समाजात पसरू शकतो.

आज प्रश्न छड लावावा की नाही, एवढ्यावर मर्यादित नाही. खरा प्रश्न असा आहे की राज्यसत्ता संविधानाच्या बाजूने ठाम उभी आहे की नाही. काही गुन्हे केवळ वैयक्तिक नसतात; ते समाजाच्या मानसिकतेवर परिणाम करतात. बाबासाहेबांचा फोटो जाळणे हे त्याचेच उदाहरण आहे. अशा घटनांमुळे दलित, वंचित आणि अल्पसंख्याक समाजात भीती निर्माण होते, तर द्वेष पसरवणाऱ्या शक्तींना आत्मविश्वास मिळतो.

मात्र येथे एक महत्त्वाची बाब लक्षात घ्यावी लागेल. कठोर कायदे हे उपाय असू शकतात, पण तेच अंतिम उत्तर नाहीत. जर कायद्याची अंमलबजावणी निवडक झाली, किंवा राजकीय सोयीप्रमाणे झाली, तर तोच कायदा दडपशाहीचे साधन ठरू शकतो. त्यामुळे कारवाई ही कठोर असली पाहिजे, पण ती न्याय्य, पारदर्शक आणि संविधानिक चौकटीत असली पाहिजे.

सरकारची खरी कसोटी इथे आहे.

दोषींना तात्काळ शिक्षा होते का?

समाजात द्वेष पसरवणाऱ्या विचारसरणींविरोधात ठोस भूमिका घेतली जाते का?

आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, बाबासाहेबांनी दिलेल्या समता-बंधुतेच्या मूल्यांचे संरक्षण केले जाते का?

चंद्रशेखर आझाद यांचे पत्र हे केवळ एक राजकीय हस्तक्षेप नाही, तर संविधानाच्या रक्षणासाठी दिलेला इशारा आहे. बाबासाहेबांचे विचार फोटो जाळून संपत नाहीत. उलट, अशा घटनांमुळे ते अधिक ठामपणे जनतेच्या मनात रुजतात. इतिहास साक्षी आहे की, विचार जाळणाऱ्यांचा पराभव होतो आणि विचार मांडणारे अजरामर होतात.

आज गरज आहे ती भावनांना नव्हे, तर संविधानाला केंद्रस्थानी ठेवून निर्णय घेण्याची. कारण भारत टिकून आहे तो दडपशाहीवर नाही, तर बाबासाहेबांनी दिलेल्या न्याय, समता आणि मानवी प्रतिष्ठेच्या मूल्यांवर.

या मूल्यांचे रक्षण करणे, हीच खरी देशभक्ती आहे.

# पाथरवाडीच्या अध्यात्मिक पीठात मोफत कर्करोग निदान शिबिराचे आयोजन

लातूर : रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन, विवेकानंद कॅंसर अँड सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल व शंकरशेठ साबळे आय हॉस्पिटल अँड ए.व्ही. देसाई आय इस्क्टिट्यूट, श्री महादेव आणि हनुमान मंदिर अध्यात्मिक पीठ ,पाथरवाडीच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. १० जानेवारी २०२६ रोजी मोफत कर्करोग निदान, मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

हे शिबीर अध्यात्मिक पीठात सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत पार पडणार आहे. या शिबिराचा परिसरातील गरजू रुग्णांनी लाभ घ्यावा,असे आवाहन रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे अध्यक्ष अमोल दाडगे , सचिव पवन मालपाणी, मोतीराम वर्मा, प्रकल्प प्रमुख किशोर दाताळ , समन्वयक नवनाथ मद्दे मामा आदी मान्यवरांनी केले आहे.

# पत्रकारिता ही लोकशाहीच्या हिताची तलवार, तर सुरक्षेची ढाल.

पत्रकारिता ही कोहीनुरच्या हिऱ्यापेक्षाही मौल्यवान आणि तलवारी पेक्षाही तीक्ष्ण धारधार मानल्या जाते आणि आहे सुध्दा.त्याचप्रमाणे पत्रकारिता ही जगाचा तिसऱ्या डोळ्याची भुमिका बजावीत असते.पत्रकारिता समाज घडविण्याचे व राष्ट्रहीत जपण्याचे मोठे माध्यम आहे. महाराष्ट्रात दरवर्षी ६ जानेवारीला पत्रकार दिवस साजरा केला जातो.दिनांक २० फेब्रुवारी १८१२ ला बाळशास्त्री जांभेकर यांचा जन्म पोंभुर्ले देवगड,तालुका सिंधुदुर्ग येथे झाला व मराठी जगतात लखलखता तारा उदयास आला.मराठी भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा या उद्देशाने ६ जानेवारी १८३२ ला दर्पण नावाचे पहिले मराठी वृत्तपत्र जांभेकरांनी सुरू केले या दिनाचे स्मरण सर्वांना रहावे म्हणून ६ जानेवारी दर्पण दिन किंवा पत्रकार दिन म्हणून दरवर्षी साजरा केला जातो. बाळशास्त्री जांभेकरांना मराठी भाषेतील पत्रकारिता सुरू केल्यामुळे द फादर ऑफ मराठी जर्नलिज्म या रूपाने सुध्दा ओळखले जाते.जांभेकरांचे काही तत्व होते सत्तेच्या विरोधात लीखाण करने.कारण हे लीखाण सत्तेच्या विरोधात नसुन सत्ताधाऱ्यांच्या चुकांमध्ये दुरूस्ती करणे होय. जोपर्यंत पत्रकार सत्तेच्या विरोधात लिहिणार नाही तोपर्यंत देशात काय सुधारणा करायची आहे हे कदापी कोणाच्याच लक्षात येणार नाही.त्यामुळे सरकारच्या चुका लेखणीच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवुन सरकारचे डोळे उघडण्याचे काम पत्रकारांमार्फत व्हायला पाहिजे. म्हणनूच जांभेकर म्हणतात सत्ताधाऱ्यांनी पत्रकारांचे कौतुक नव्हे,उलट शिव्या घातल्या तर खऱ्या पत्रकारितेची पावती मीळते असे ते मानीत. भारतातच नाही तर संपूर्ण जगात पत्रकारितेला मोठे महत्व आहे.त्यामुळे पत्रकारितेला चौथास्तंभ ही उपमा दिली आहे. जागतिक हालचाली, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय, राजकीय हालचाली, जिल्हास्तरीय, गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत संपूर्ण माहिती १४० कोटी जनतेपर्यंत पोहचवीण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते.प्रत्येक वर्षी ६ जानेवारीला महाराष्ट्रात पत्रकार दिवस साजरा केला जातो. १९२० मध्ये लेखक वाल्टर लिपमैन आणि एक अमेरिकी दार्शनिक जॉन डेवी यांनी लोकतांत्रिक समाजामध्ये पत्रकारितेच्या भुमिकेवर विचार विमर्श प्रकाशित केले होते.

पत्रकारिता जनता आणि नितीनिर्माते यांच्यातील मध्यस्थीतीची भुमिका हाताळीत असते.तेव्हाच आपल्याला समतोलता दिसून येते.या समतोलतेचे दायीत्व पुर्णपणे पत्रकारितेवर अवलंबून असते व पत्रकार आपली जबाबदारी मोठ्या शिताफीने पारपाडतो. प्रत्येक बाब जनतेच्या हितासाठी असावी या उद्देशाने प्रत्येक गोष्ट जनतेच्या हितार्थ प्रकाशित केल्या जाते. पत्रकारितेचे अनेक तत्व आहेत लिखाण, समाजातील घडामोडींवर नजर ठेवून माहीती एकत्र करने, कॅमेरात कैद करने व ती पत्रकारितेच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहचविने. आजच्या आधुनिक युगात वर्तमानपत्र, रेडिओ, दूरदर्शन, वेब-पत्रकारिता, मिडिया, फेसबुक, सोशल मीडिया, ई-पत्रकारिता यांच्या माध्यमातून पत्रकारितेची भुमिका मोठ्या प्रमाणात बजावली जाते.परंतु काही वाहीण्या स्वत:च्या स्वार्थासाठी कार्य करतात. यामुळे पत्रकारितेची बदनामी होतांना सुध्दा आपण उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे.परंतु पत्रकारिता तीच असते ज्यामुळे समाजाची जडणघडण मजबूत होते यालाच म्हणतात चौथास्तंभ.पत्रकारिता साधी शैली नसुन कोणत्याही घटनेचा लिखित रूपात वर्णन करण्याकरिता अनेक शैलींचा सटीकतेने उपयोग केल्या जातो यालाच म्हणतात पत्रकारितेची शैली. पत्रकारितेचे अनेक प्रकार आहेत एम्बुश पत्रकारिता, सेलिब्रिटी पत्रकारिता, कन्वर्जेस पत्रकारिता,गोंजो पत्रकारिता, खोजी पत्रकारिता, नवीन पत्रकारिता, विज्ञान पत्रकारिता, खेळ पत्रकारिता इत्यादी अनेक पत्रकारितेचे प्रकार आपल्याला पहायला मिळतात. पत्रकारांमध्ये नेहमी निष्पक्षता दिसून येते त्यामुळे समाजात खंबीरपणे उभे राहून आपल्या लेखणीच्या माध्यमातून तिक्ष्ण(धारधार) लीखाण केल्या जाते.यातुनच समाजाला दीशा-निर्देश समजुन येतात.पत्रकारितेच्या लेखणीत एवढी धार असते की तलवारीची धार त्यासामोर फीक्की पडतांना दिसून येते.कारण संपूर्ण समाजाच्या नैतिकतेची जबाबदारी पत्रकारांच्या खांद्यावर असते व ती लेखणीतून निर्माण होत असते.आज पत्रकारितेच्या माध्यमातून स्थल,जल,वायु, आकाश-पाताळ,ग्रह-तारे, चंद्र-सुर्य, चंद्रयान यातील घडामोडी जनतेला कळुन येतात.आज मिडियाच्या माध्यमातून व वृत्तपत्र समूहाच्या माध्यमातून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडी आपण पहात असतो.या घडामोडी समाजापर्यंत पोहचविण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते.ज्याप्रमाणे सुरंग खोदुन खनीज संपत्ती शोधल्या जाते. त्याचप्रमाणे पत्रकारिता व लेखक आपले विचार समाजापर्यंत पोहचविण्याकरिता संपूर्ण ताकदीनिशी प्रयत्न करीत असतो. तेव्हाच देशातील प्रत्येक व्यक्ती सकाळी वर्तमानपत्राची आतुरतेने वाट पाहत असतो. वर्तमानपत्राला सकाळचा नाश्ता सुध्दा म्हणतात. यावरून स्पष्ट होते की पत्रकारिता व लेखक यांच्यामुळे समाजाची जडणघडण होण्यास मोठी मदत मीळत असते. आज पत्रकारिता कोहीनुरच्या हीऱ्यापेक्षाही जास्त मौल्यवान आहे. आज एका लेखणीतून लाखो-अरबो शब्द बाहेर पडतात म्हणजेच पत्रकारिता ही समुद्रापेक्षाही अफाट व नदीपेक्षा सोज्वळ निर्मळ असल्याचे दिसून येते. यातुनच जगात मोलाचा संदेश जात असतो.लेखणीमध्ये व पत्रकारितेमध्ये एवढे तालमेल आहे की संपूर्ण जग लेखणीच्या माध्यमातून पत्रकारितेवर मोठ्या प्रमाणात विश्वास ठेवतो.मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण नावाचे पहिले मराठी दैनिक सुरू केले होते. बाळशास्त्रींना मराठी, संस्कृत, बंगाली, गुजराती, कानडी,तेलगू, फारसी, फ्रेंच, लॅटिन व ग्रीस या भाषांचे ज्ञान होते.मराठी व संस्कृतमध्ये निष्णात झाल्याने बाळबोध,गीतपाठ, वेदपठण,अमरकोश,लघुकौमुदी व पंचमहाकाव्य या संस्कृत ग्रंथांचा दांडगा अभ्यास होता.१८३२ साली सुरू करण्यात आलेले बाळशास्त्री जांभेकरांचे दर्पण हे मराठीतील पहिले वृत्तपत्रहोय.त्यावेळी इंग्रजी सत्ताधाऱ्यांना स्थानिकांच्या अडचणी आणि भावना कळाव्या यासाठी दर्पणमध्ये एक स्तंभ इंग्लिश भाषेत लिहिला जात असे. यानंतर राजा राममोहन रॉय यांचा संवाद कौमुदी टिळक-आगरकरांचा 'मराठा' व 'केसरी' गणेश शंकर विद्यार्थी यांचा 'प्रताप' डॉ बाबासाहेब आंबेडकर याचे मुकनायक ही सर्व वृत्तपत्रे आर्थीक तोटा सहन करून समाज जागृत करण्यासाठी चालविल्या जात होती. पत्रकारीतेतील तीक्ष्ण(धारधार) लेखणीमुळे भारत स्वतंत्र करण्यास मोठी भूमिका होती.त्यामुळे इंग्रजांना भारत सोडून जावे लागले व १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला.परंतु आता देशात काही राजकीय पक्षांची वृत्तपत्रेसुध्दा दिसून येतात हि वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्या आणि दुरदर्शन वाहीण्या पत्रकारितेला कलंकित करण्याचे काम करीत असतात.याला केंद्र व राज्य सरकारने कोठेतरी रोखले पाहिजे.आपल्या पुर्वजांनी ज्याप्रमाणे पत्रकारितेची जोपासना केली त्याचप्रमाणे पत्रकारितेची जोपासना व्हायला पाहिजे आणि पत्रकारिता व चौथास्तंभ याला कोणताही आघात पोचनार नाही याची जबाबदारी राजकीय पुढाऱ्यांनी व सरकारने घेतली पाहिजे. टिआरपी वाढावी म्हणुन काही वाहीण्यांनी पत्रकारीतेची व चौथास्तंभ याची पायमल्ली करण्याचा प्रयत्न केला होता.परंतु सरकारने टिआरपी घोटाळा उघडकीस आणुन पत्रकारिता व चौथास्तंभ यांच्यावर थोडीशीही इजा होऊ दिली नाही.६ जानेवारी पत्रकार दिवसांच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की पत्रकारिता व चौथास्तंभ याला कुठल्याही प्रकारची क्षती होणार नाही याची काळजी व जबाबदारी सर्वांनीच घेण्याची गरज आहे. देशात कुठल्याही परिस्थितीत पत्रकारितेचे व्यवसायीकरण होवु नये व राजकीय दृष्ट्या कोसो दूर राहुन पत्रकारिता आणखी बळकट केली पाहिजे.कारण पत्रकारिता ही प्रसारमाध्यमांचे काम करीत असते यातुनच समाजाला दीशा निर्देश मिळत असते व समाज निर्माण होतो. पत्रकारिता ही वटवृक्षासारखी अफाट आहे कारण समाजातील घटना उन, पाउस, थंडी,वादळ, सुनामी यासारख्या असतात यापासून संरक्षण करण्याचे काम पत्रकारिता नेहमी करीत असते. पत्रकार आपल्या जिवाची पर्वा न करता निर्भीडपणे कार्य करीत असतो.परंतु गेल्या काही वर्षांपासून असामाजिक तत्वांकडुन पत्रकारांवर हल्ले होत असतांनाचे दिसून येते याचा मी जाहीर निषेध करतो. अशा असामाजिक तत्वांना केंद्र व राज्य सरकारांनी कोठेतरी रोखले पाहिजे व कठोर कारवाई केली पाहिजे. ६ जानेवारी पत्रकारिता व दर्पण दिनाला शत-शत प्रणाम.जय हिंद!

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# दर्पणकारांचे पत्रकारितेतील योगदान आणि आजच्या पत्रकारांची नैतिक जबाबदारी

६ जानेवारी राज्य मराठी पत्रकार दिन म्हणून साजरा केला जातो. याच दिवशी सन १८३२ मध्ये दर्पणकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी मराठी भाषेतील पहिले वृत्तपत्र दर्पण सुरू केले. पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ मानला जातो. समाजाला दिशा देणे, सत्याचा शोध घेणे आणि समाजहितासाठी आवाज उठवणे ही पत्रकारांची जबाबदारी आहे. या पार्श्वभूमीवर दर्पणकार आचार्य जांभेकरांचे पत्रकारितेमधील योगदान आणि आजच्या पत्रकारांनी पाळावयाची नैतिकता यांचा विचार करणे आवश्यक ठरते.

बाळशास्त्री जांभेकर यांचे पत्रकारितेतील महत्त्व: मराठी पत्रकारितेची सुरुवात: ६ जानेवारी १८३२ मध्ये त्यांनी दर्पण हे मराठीतील पहिले वृत्तपत्र सुरू केले. या वृत्तपत्राने समाजजागृतीचे कार्य केले. दर्पण'च्या पहिल्या अंकात इंग्रजी व मराठी दोन्ही भाषांमध्ये माहिती दिली जात असे. यामुळे इंग्रजी सत्ताधाऱ्यांना स्थानिकांच्या अडचणी व भावना समजून घेता आल्या. 'दर्पण'ने समाजातील अज्ञान, दारिद्र्य, भाकड समजुतींविरुद्ध आवाज उठवला आणि लोकांना जागरूक केले. या वृत्तपत्राने साडे आठ वर्षे कार्य केले आणि १८४० मध्ये त्याचा शेवटचा अंक प्रकाशित झाला. त्याच वर्षी त्यांनी 'दिग्दर्शन' हे वृत्तपत्रही सुरू केले होते. मराठीतील पहिले वृत्तपत्र 'दर्पण' सुरू करून त्या माध्यमातून एतद्देशिय समाजाला प्रबोधित करण्याच्या केलेल्या कार्यामुळे त्यांना 'दर्पणकार' म्हणून संबोधले जाते.



जांभेकरांनी पत्रकारितेद्वारे शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. अंधश्रद्धा, अज्ञान आणि सामाजिक कुप्रथांविरुद्ध त्यांनी लेखन केले. ब्रिटिश काळात त्यांनी लोकांना स्वातंत्र्य, न्याय आणि समानतेची जाणीव करून त्यांच्यामध्ये राष्ट्रीय चेतना जागृत केली. पत्रकारितेला त्यांनी सामाजिक परिवर्तनाचे साधन बनवले. त्यांच्या लेखनात सत्य, विवेक आणि समाजहित यांचा आग्रह होता. त्यामुळेच त्यांना मराठी पत्रकारितेचे जनक ही उपाधी मिळाली.

आजच्या पत्रकारांनी घ्यावयाची काळजी:-आजच्या काळात पत्रकारिता अधिक व्यापक झाली आहे. छापील माध्यमांबरोबरच दूरदर्शन, रेडिओ, डिजिटल पोर्टल्स आणि सोशल मीडिया ही नवे माध्यमे उपलब्ध झाली आहेत. या बदलत्या परिस्थितीत पत्रकारांनी काही बाबींची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे:

सत्यता आणि पडताळणी: बातमी देताना तथ्यांची पडताळणी करणे अत्यावश्यक आहे. अप्रमाणित माहिती किंवा अफवा पसरवणे टाळावे.

निष्पक्षता: कोणत्याही राजकीय, सामाजिक किंवा आर्थिक दबावाला बळी न पडता निष्पक्ष वृत्तांकन करणे ही पत्रकाराची जबाबदारी आहे.

लोकहिताचा विचार: बातमी ही केवळ सनसनाटी निर्माण करण्यासाठी नसून समाजहितासाठी असावी.

भाषेची शुद्धता: पत्रकारितेत वापरली जाणारी भाषा स्पष्ट, सोपी आणि शुद्ध असावी. चुकीची भाषा जनमानसात गोंधळ निर्माण करू शकते.

गोपनीयतेचा आदर: व्यक्तीगत गोपनीयता आणि संवेदनशील माहिती यांचा आदर राखणे आवश्यक आहे.

नवमाध्यमांचा जबाबदार वापर: सोशल मीडिया हे प्रभावी साधन आहे, परंतु त्याचा वापर करताना नैतिकता आणि जबाबदारी पाळणे गरजेचे आहे.

पत्रकारितेतील नैतिकता:पत्रकारितेची नैतिकता ही तिच्या विश्वासार्हतेचा पाया आहे.

सत्यनिष्ठा: पत्रकाराने सत्याला प्राधान्य द्यावे.

स्वतंत्रता: कोणत्याही दबावाखाली न येता स्वतंत्रपणे बातमी देणे.

उत्तरदायित्व: समाजाप्रती उत्तरदायित्वाची जाणीव ठेवून कार्य करणे.

संवेदनशीलता: सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक बाबींमध्ये संवेदनशीलता राखणे.

लोकशाही मूल्यांचे संरक्षण: पत्रकारितेने लोकशाही मजबूत करावी, जनतेला माहितीपूर्ण करावे.

आजचा पत्रकार दिन हा केवळ स्मरणाचा दिवस नाही, तर आत्मपरीक्षणाचा दिवस आहे.आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचे कार्य आजही प्रासंगिक आहे. त्यांच्या विचारधारेला आधुनिक पत्रकारिता आणि माध्यम क्षेत्रात महत्त्व आहे. त्यांच्या कार्यामुळे पत्रकारितेत एक नैतिक आधार तयार झाला, जो आजही पत्रकारितेचा आधारभूत आहे. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांचा पत्रकारितेतील वारसा आणि कार्य महत्त्वाचे आहे. त्यांनी पत्रकारितेला समाजजागृतीचे साधन बनवले. आजच्या पत्रकारांनी त्यांच्या आदर्शांचा विचार करून सत्यनिष्ठा, निष्पक्षता आणि समाजहित यांचा आग्रह धरावा. पत्रकारिता हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे, हा स्तंभ मजबूत राहणे, हे पत्रकारांच्या नैतिकतेवर अवलंबून आहे.

# काँग्रेसच्या बेकारीला भीक घालू नका भाजपा प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण : बुथ मेळाव्यात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन

लातूर/प्रतिनिधी : केंद्र आणि राज्यात



भाजपा सरकार आहे. त्यामुळे काँग्रेसवर बेकारीची वेळ आली आहे. कुठेही सत्ता नसताना विकास कामे करण्याची खोटी आश्वासने आणि भूलथापा काँग्रेसकडून दिल्या जात आहेत. काँग्रेसच्या या भूलथापांना भीक घालू नका, असे प्रतिपादन भाजपा प्रदेशाध्यक्ष आ. रविंद्र चव्हाण यांनी केले.

लातूर शहर महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने लातूर येथे आयोजित बुथ कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात प्रदेशाध्यक्ष चव्हाण बोलत होते. व्यासपीठावर निवडणूकप्रमुख आमदार संभाजी पाटील निलंगेकर, मराठवाडा संघटन सरचिटणीस संजय कोडगे, आ. रमेशअप्पा कराड, आ. अभिमन्यू पवार, कृषीमूल्य आयोगाचे अध्यक्ष पाशा पटेल, भाजपा नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष बस्वराज पाटील मुरुमकर, शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, माजी खा. सुनिल गायकवाड, माजी आ. त्र्यंबकनाना भिसे, अविनाश कोळी, सुधिर धुत्तेकर यांच्यासह सर्व मंडलाध्यक्षांची उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना रविंद्र चव्हाण म्हणाले की, ही मनपा निवडणूक केवळ नगरसेवक निवडून देण्यासाठी नाही तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाहिलेले विकसित भारताचे व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील विकसित महाराष्ट्राच्या स्वप्नपूर्तीसाठी आहे. त्यासाठी लातूरही विकसित झाले पाहीजे. मनपात पारदर्शक कारभार झाला पाहिजे. ही निवडणूक आपल्याला बूथवर जिंकायची आहे. प्रत्येक बूथवर होणाजया मतदानापैकी ५० टक्के पेक्षा अधिक मते आपल्याला मिळाली पाहिजेत. त्यासाठी आगामी १० दिवसात प्रत्येक घर पिंजून काढा. घरातील प्रत्येक व्यक्तीला केंद्र आणि राज्य शासनाच्या योजना समजावून सांगा असे ते म्हणाले.

काँग्रेस कधीही गरिबांसोबत नव्हती याउलट मोदी सरकारने २५ कोटी लोकांना दारिद्र्य रेषेच्या बाहेर काढले. लोकहिताच्या अनेक योजना राबविल्या गेल्या. त्यामुळे सर्वसामान्य जनता सुखी झाली. जीएसटीच्या माध्यमातून मिळालेला निधी केंद्राकडून राज्य सरकार व तेथून स्थानिक स्वराज्य संस्थांकडे येतो. यामुळे एक विचाराचे सरकार आवश्यक असून लातूरमध्येही भाजपाचाच महापौर झाला पाहिजे, असेही ते म्हणाले.

## बाहेरचा कोण ? : आ. निलंगेकर यांचा सवाल

आ. संभाजी पाटील निलंगेकर म्हणाले की, संभाजी पाटील निलंग्याचे, अभिमन्यू पवार औश्याचे, रमेश कराड रेणापूरचे असे सांगत काँग्रेसकडून दिशाभूल केली जात आहे.पंरतु माझे घर प्रभाग १७ मध्ये आहे. अभिमन्यू पवार प्रभाग १३ मध्ये राहतात. डॉ. अर्चना पाटील प्रभाग १५ मध्ये राहतात. माजी खा. सुनिल गायकवाड प्रभाग १२ मध्ये राहतात तर आ. रमेश कराड यांचे घरही महापालिकेच्या हद्दीतच आहे. आमच्यावर टीका करणारे अमित देशमुख मात्र मनपा हद्दीच्या बाहेर बाभळगावात राहतात. मग खरा बाहेरचा कोण ? असा सवाल आ. निलंगेकर यांनी उपस्थित केला. माझे शिक्षण छत्रपती शाहू महाविद्यालयात झाले. रमेशअप्पा कराड रामेश्वर येथे शिकले. डॉ. अर्चनाताई यांचे शिक्षण लातूर येथेच झाले अभिमन्यू पवार केशवराज विद्यालयात शिकले अमित देशमुख मात्र मुंबईत राहून शिकले त्यांना लातूरच्या समस्यांची जाणिवही नाही, असेही आ. निलंगेकर म्हणाले.





कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना आ. संभाजी पाटील निलंगेकर म्हणाले की, स्व. विलासराव देशमुख यांच्या पुण्याईवर दोन वेळा काँग्रेसला लातुरकरांनी निवडून दिले. पुण्याईचा हा चेक आता कॅश होणार नाही तर तो बाऊंस होणार आहे. आता आपल्याला मोदींच्या विकासाचा चेक दिल्लीतून गल्लीत आणायचा आहे. यावर्षी मकरसंक्रातीच्या करीवर मतदान होणार असून ही कर काँग्रेसवर येणार आहे. विधानसभेला राहिलेली कसर महानगरपालिकेला भरून काढा असे आवाहन आ. निलंगेकर यांनी केले.

डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर म्हणाल्या की, भाजपा हा परिवार आहे. पक्षावर विश्वास असल्यानेच मोठ्या प्रमाणात प्रवेश होत आहेत. विधानसभा निवडणूकीत आपण थोड्या मताने पराभूत झाल्याची सल सर्वांच्याच मनात आहे. ही सल भरून काढण्यासाठी महानगरपालिकेत भाजपाचे सर्वच्या सर्व नगरसेवक विजयी करण्याचा निर्धार लातूरकरांनी केला असल्याच्या त्या म्हणाल्या.

प्रास्ताविकात शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी भाजपाकडे दूरदृष्टी असणारे विकासाची भूमिका घेवून काम करणारे नेतृत्व असल्याचे सांगितले. यामुळेच भाजपा सर्वसामान्य जनतेशी जोडली गेलेली आहे. मनपा निवडणूकीत भाजपा पूर्ण ताकदीने लढत असून मनपात भाजपाचीच सत्ता येण्यासाठी सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते एकदिलाने काम करत असल्याचे सांगितले.

प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यावेळी काँग्रेसचे माजी नगरसेवक महादेव बरुरे, धनंजय शेळके, नागसेन कामेगावकर यांच्यासह प्रफुल्ल कांबळे, स्वप्नील माकणे, उमेश धर्माधिकारी, महेश खुरसाळे व असंख्य पदाधिकाजयांनी भाजपात प्रवेश केला. यावेळी दोन अपक्ष उमेदवारांनी भाजपा उमेदवारांना पाठींबा जाहीर केला. यावेळी विकसित लातूरसाठी भाजपाचा जाहीरनामा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण व मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला.

## बचपन बालविद्या मंदिरचे स्नेहसंमेलन उत्साहात चिमुकल्यांनी धरला गाण्यावर ठेका

केज/प्रतिनिधी-केज शहरातील धारूर



रोडलगतच्या बचपन बाल विद्यामंदिर चे स्नेहसंमेलन मुक्ताबाई लॉन्स मध्ये शनिवार रोजी झाले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते हनुमंत भोसले,

प्रमुख उपस्थिती डॉ.हनुमंत सौदागर, पत्रकार रामदास तपसे,गौतम बचुटे, शरद गिराम,श्री तिडके

डॉ वसुदेव नेहरकर,डॉ उमाकांत मुंडे,संजय कराड,शाम कराड, अँड उध्दव कराड, राख,बचपन बाल विद्यामंदिर चे विनायक कराड, यांच्या हस्ते उदघाटन झाले.यावेळी

हनुमंत भोसले म्हणाले पालकांनी विद्यार्थ्यांवर लक्ष केंद्रित करावे. केजचा सांस्कृतिक वारसा जपावा असे आवाहन केले.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ, कला संगीत हे महत्त्वाचे आहे. सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थी घडतो असे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले.

यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी विविध गीत सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. माऊली माऊली ,यांसह मराठी,हिंदी गीत ,लावणी नृत्य सादर केले.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिक्षिका वैशाली कराड,ज्ञानेश्वरी सत्वधर व त्यांच्या टीम ने परिश्रम घेतले.सूत्रसंचालन श्रावणी कराड यांनी केले.कार्यक्रमास नागरिक ,पालक,मोठया संख्येने उपस्थित होते.

## 'महात्मा बसवेश्वर'चा मतदान जनजागृती वाकेथॉनमध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

लातूर-लातूर शहर महानगरपालिका,





लातूर रोटरी क्लब परिवार, महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभाग, राष्ट्रीय सेवा योजना, व्यक्तिमत्त्व विकास केंद्र, युवती मंच आणि कनिष्ठ महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने लातूर शहर महानगरपालिका अंतर्गत क्रीडा संकुल ते टाऊन हॉल पर्यन्त निघालेल्या मतदान जनजागृती वाकेथॉनमध्ये शिक्षक आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या रॅलीत महात्मा बसेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. नितीन वाणी, डॉ. गुणवंत बिरादार, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ. रत्नाकर बेडगे, प्रा. किसनाथ कुडके, प्रा. विश्वनाथ स्वामी, प्रा. रवी सोनोने, प्रा. के. आर. सूर्यवंशी, प्रा. के. आर. बिराजदार, प्रा. आशीष क्षीरसागर, प्रा. रवींद्र सुरवसे, प्रा. उदयकुमार धनुरे, प्रा. आशिष स्वामी, प्रा. कल्पना गिराम, प्रा. डॉ. अश्विनी रोडे, प्रा. रूपाली हलवाई, प्रा. मीनाक्षी नीला, प्रा. नीता दलगडे, प्रा. पूजा घार, प्रा. महादेवी धडे आणि संगमेश्वर मुळे यांच्यासह महाविद्यालयातील २०० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

या रॅलीत लोकशाहीमधील मतदानाचे महत्त्व सांगणाऱ्या घोषणा, कट आउट, बॅनर लावून येत्या १५ जानेवारी २०२६ रोजी होणाऱ्या महानगरपालिका निवडणुकीचा मतदानाचा टक्का वाढावा याकरिता जनप्रबोधन करण्यात आले.

विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त आणि उत्साही सहभागाबद्दल महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ. नल्ला भास्कर रेड्डी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## ज्ञान हे माणसच्या व्यक्तिमत्व विकासाचे साधन आहे-भिक्खु पय्यानंद थेरो

लातूर-जगामध्ये शालेय शिक्षण आणि आध्यात्मिक शिक्षण असे ज्ञानाचे प्रकार आहेत. शालेय ज्ञान हे भौतिक साधनांची परिपुर्तता करते तर आध्यात्मिक ज्ञान हे मनुष्याचे वैचारिक आणि व्यक्तिमत्व उंचावते. ज्ञान हे माणसच्या व्यक्तिमत्व विकासाचे साधन असल्याचे प्रतिपादन भिक्खु पय्यानंद थेरो यांनी केले आहे.



पौष पौर्णिमेनिमित्त महाविहार, सातकर्णी नगर येथे आयोजित धम्मदेशना व सत्कार कार्यक्रमात ते बोलत होते.

भिक्खू पय्यानंद थेरो पुढे म्हणाले की, ज्ञान हे केवळ उपजीविकेचे साधन नसून ते माणसाच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्व घडवण्याची प्रक्रिया आहे. आजचे शालेय शिक्षण माणसाला कौशल्ये, रोजगार व भौतिक प्रगतीकडे घेऊन जाते; मात्र त्याला पूरक म्हणून आध्यात्मिक शिक्षणाची नितांत गरज आहे. आध्यात्मिक ज्ञानाशिवाय शालेय शिक्षण अपूर्ण ठरते, आध्यात्मिक शिक्षणामुळे मनुष्याला स्वतःकडे पाहण्याची दृष्टी मिळते. विचारांची शुद्धता, आचारातील संयम, करुणा, मैत्री आणि समत्व या मूल्यांची जोपासना आध्यात्मिक ज्ञानातूनच होते असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाची सुरुवात तथागत गौतम बुद्ध, बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या प्रतिमांच्या पूजनाने करण्यात आली. त्यानंतर पू. भिक्खू संघाच्या उपस्थितीत त्रिसरण, पंचशील व अष्टशील उपस्थितांनी ग्रहण केले.

याप्रसंगी क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंतीही उत्साहात साजरी करण्यात आली. सदरील कार्यक्रमास प्रा. शिवशरण हावळे, इंजि. एम. एन. गायकवाड, चेअरमन विठ्ठल जाधव, माजी सरपंच सुनील बनसोडे, सामाजिक कार्यकर्ते बाबासाहेब कांबळे, पोलीस निरीक्षक इंद्रजीत वर्धन आदि मान्यवर, आठवी अ. भा. बौद्ध धम्मपरिषद यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल महाविहार धम्मसेवक ग्रुप सदस्य आणि डॉ. जितेंद्र वाघमारे यांची पशुसंवर्धन विभागाच्या सहाय्यक आयुक्तपदी पदोन्नती झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

हा संपूर्ण कार्यक्रम भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली शिस्तबद्ध व प्रेरणादायी वातावरणात पार पडला. धम्म, शिक्षण व सामाजिक जाणीव यांचा समन्वय साधणारा हा कार्यक्रम उपस्थितांसाठी वैचारिक समृद्धी देणारा ठरला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी केले तर यशस्वीतेसाठी भंते बोधिराज, उदय सोनवणे, अनिरुद्ध बनसोडे, करण ओव्हाळ, सतीश मस्के, राजेश कदम, गौतम आदमाने, यशपाल मस्के, मिलिंद धावारे यांनी परिश्रम घेतले.

याप्रसंगी प्रशांत जानराव, सत्यप्रकाश कांबळे, आम्रपाल बनसोडे, जयंत कांबळे, त्र्यंबक कवठेकर, मारोती सरवदे, अंतेश्वर थोटे, संतोष कसबे, आकाश सरवदे, राहुल शाक्यमुनी, निलेश बनसोडे, विशाल वाहुळे, उत्तम गायकवाड, विलास अवशंख, गौतम चिकाटे, वसंत वाघमारे, कृष्णा सुरवसे, गोविंद जोगदंड, शामल कांबळे, उज्वला सिरसाट, शोभा सोनकांबळे, निर्मला मधाळे, सुरेखा दंडे, निर्मला थोटे, कविता कदम, सरिता बनसोडे, निर्मला गौरकर, कांता सरवदे, पंचशीला बनसोडे, स्वाती सूर्यवंशी, पंचशीला बनसोडे, माया धावारे, यांच्या सह समाजातील प्रतिष्ठित मान्यवर वकील, डॉक्टर, प्राध्यापक, विविध नगरातील महिला मंडळी यांच्यासह मोठ्या संख्येने बौद्ध उपासक उपासिकांची उपस्थिती होती.

## संतपरंपरेमुळे भारताच्या संस्कृतीची जागतिक पातळीवर वेगळी ओळख-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुंबई-सामाजिक आणि शैक्षणिक कार्य आणि समाजप्रबोधनाचा वारसा संतांनी वर्षानुवर्षे जपला आहे. संतपरंपरेमुळेच भारताची जगात ऐतिहासिक ओळख निर्माण झाली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.कांदिवली



(पूर्व) येथील संतमत अनुयायी आश्रम, सिंह इस्टेट येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, संतांनी आपल्या प्रबोधनातून समाजाची सर्वांगीण प्रगती साधली आहे. संतांच्या विचारांमधून सामाजिक व शैक्षणिक कार्याला दिशा मिळाली. संतमत परंपरेत मानवसेवा, समता, प्रेम व सद्भावना ही केवळ तत्त्वे नसून ती प्रत्यक्ष आचरणात आणण्याची जीवनपद्धती आहे. या मूल्यांच्या प्रसारासाठी श्री सद्गुरु शरणानंदजी महाराज परमहंस यांच्या अनुयायांच्या माध्यमातून संतमत अनुयायी आश्रमाद्वारे हे अत्यंत महत्त्वाचे कार्य सुरू आहे.मुख्यमंत्री म्हणाले की, संतमत अनुयायी आश्रमांचे कार्य समाजाला सेवेकडे आणि प्रेमाकडे नेणारे आहे. मानवसेवा, समता, प्रेम व सद्भावना या मूल्यांच्या जपणुकीसाठी आश्रमाचे योगदान अमूल्य असून, हेच संतमत परंपरेचे खरे स्वरूप आहे. संतमत परंपरेतील परमहंस महाराजांनी जात-पात व भेदभावाला विरोध करून मानवधर्म प्रधान मानला. त्यांनी आत्मज्ञान, अहंकार,त्याग व मानवसेवेचा संदेश दिला. भारतीय संस्कृतीतील गीता ही केवळ विचारधारा नसून, संस्कृती व सभ्यता जपत उत्तम जीवन जगण्याचा मार्ग असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भारतीय संस्कृती जपण्याचे महान कार्य संतपरंपरेने केले आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

यावेळी माजी मंत्री कृपाशंकर सिंह, माजी खासदार गोपाळ शेट्टी, आमदार अमित साटम, आमदार अतुल भातखळकर, आमदार प्रवीण दरेकर, संतमत अनुयायी आश्रम ट्रस्टचे सचिव राधेश्याम यादव यांच्यासह मोठ्या संख्येने भक्तगण उपस्थित होते.

# सोशल मीडियावर जातीयतेढ निर्माण करणारी आक्षेपार्ह पोस्ट रोहन गलांडे विरुद्ध गून्हा नोंद

केज/प्रतिनिधी-देशातील तमाम भीम सैनिकांचे श्रद्धास्थान आसलेल्या भीमा कोरेगावच्या शौर्यदिनाच्या बाबतीत जातीयतेढ निर्माण करणारी आक्षेपार्ह पोस्ट व्हाट्सअप स्टेटसला ठेवून, ती इंस्टाग्राम या समाज माध्यमावर वायरल करून दोन समाजात जातीय तेढ निर्माण करणाऱ्या रोहन गलांडे विरुद्ध अखेर शनिवारी रात्री केज पोलीस ठाण्यात गून्हा नोंद झाला.




चिंचोली माळी येथील स्वयंघोषीत पत्रकार रोहन उत्तम गलांडे हा समाज माध्यमावर खोट्या बातम्या देऊन नेते मंडळी व प्रतिष्ठीत लोकांवर विनाकारण बिनबुडाचे आरोप करीत आहे. व खाऊन, पिऊन चिंचोली माळी येथील दैवत श्री संत नामदेव महाराज यांच्या मंदिरात उपोषण करुन लोकांना त्रास देत असून या प्रकरणाची सखोल चौकशी करून त्याच्या विरुद्ध प्रशासनाने योग्य ती कारवाई करण्याची मागणी करणारे निवेदन महिला उपसरपंचासह ४९ गावकऱ्याच्या स्वाक्षरीचे निवेदन सर्व अधिकाऱ्यांना देण्यात आले होते. तरी सुद्धा प्रशासनाने त्याला कसलीही मज्जाव केला नाही.

सदर इसम हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा आसून, समाजा - समाजात तेढ निर्माण करणाऱ्या वृत्तीचा व सराईत आहे.

त्याच्या विरुद्ध माहिती तंत्रज्ञान अधिनियम आणि जातीय तेढ निर्माण करून मागासवर्गीय शूरवीरांचा खोडसाळपणे अवमान करून व जातीय भावनेने प्रेरित होऊन पोस्ट व्हायरल केल्याप्रकरणी त्याच्यावर अनुसूचित जाती-जमाती कायद्याअंतर्गत कठोर कारवाई करण्यात यावी अशी मागणी दलित चळवळीतील सर्व संघटना व पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाज बांधवांनी केली आहे.

निवेदनावर योगेश गायकवाड, बाळासाहेब ओव्हाळ, चंद्रकांत खरात , बबलू साखरे, लखन हजारे, अशोक गायकवाड, तात्या गवळी, गौतम बचुटे, पांडुरंग जोगदंड, बाबुराव गालफाडे, लिंबराज गायकवाड, समाधान बचुटे, अमोल मस्के, प्रवीण मस्के इत्यादींनी केली होती.

रोहन गलांडेच्या पोस्ट मुळे दलित समाजाच्या आदर्शाचा आपमान झाल्यामुळे तमाम दलित समाज बांधवांच्या भावना दुखवल्या आहेत. त्यामूळे त्याच्यावर अट्रॉसिटी चा गून्हा नोंद करून, दोषीवर तात्काळ कठोर कारवाई करून त्याला अटक करण्यात यावी. पोलीस प्रशासनाने दोषी विरुद्ध ट्रॉसिटी क्ट अनुसार कलम लावले नाही तर तीव्र व उग्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल असा इशाराही तमाम दलित कार्यकर्त्यांनी प्रशासनाला दिला आहे.

रोहन गलांडे हा सतत खाऊन पिऊन चिंचोली माळी येथेल संत नामदेव महाराज मंदिरात खोटे नाटे उपोषण करतो.व प्रशासनास व लोकांना वेठीस धरतो.त्यामुळे मंदिरात येणार्या भाविकांना अडचण होते व त्यांच्या धार्मीक भावना दुखावल्या जातात. रोहन गलांडे हा दारु पिदाडा असून या पुर्वी त्याने गावातील राजकीय नेत्यांचे बॅनर फाडून तो त्याच्या वर झोपला होता त्यावेळी त्याच्यावर गून्हा नोंद झाल्यानंतर तो १५ दिवस न्यायालयीन कोठडीत होता. तरीही त्याच्या वागण्यात बदल झाला नाही. तसेच जेष्ठ स्वातंत्र्य सैनिक बसलींगआप्पा भुजबळ यांच्या स्मारकावर बसून दारु पिऊन स्मारकाची विटंबना केली आहे या संदर्भात त्यांच्या वर गुन्हे दाखल झाले आहेत व त्याला अटक झाली होती. तो सतत टपरीधारक हॉटेल व्यावसायिक, लोकप्रतिनिधी यांचेविरुद्ध खोट्या बातम्या देऊन ब्लॅकमेल करतो.खरेदी केलेल्या वस्तूचे पैसे देत नाही अशा आशयाचे बाईट व्यवसायिकांनी पत्रकारांना दिली आहे.या प्रकरणी गून्हा दाखल होताच रोहन गलांडे हा फरार झाला आसून, या प्रकारणाचा तपास जमादार तुकाराम मुरकुटे हे करीत आहेत.

ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी चिंचोलीमाळी यांनी रोहण उत्तम गलांडे यांना उपोषणापासून परावृत करणेकामी यथायोग्य सर्व प्रयत्न केल्याचे निदर्शनास आले आसतानाही. उपोषणकर्ते रोहण गलांडे हा उपोषणावर ठाम होता. त्यामूळे या प्रकरणी उपोषणकर्ते हे प्रशासनास विनाकारण वेठीस धरण्याचे काम करीत असून सदर उपोषणामुळे चिंचोलीमाळी या गावातील दोन समाजामध्ये तेढ निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्याच्या या आशा वा गण्यासाला गावकरी वैतागले आहेत.

तरी प्रस्तुत प्रकरणी आपले स्तरावरुन नियमानुसार उचीत कार्यवाही अनुसरण्यात यावी.आसे तहसीलदारांनी पोलीस निरीक्षक यांना कळविले होते.

# सावित्री आजही सुरक्षित नाही -प्रा.डॉ. गिरी वृषाली

केज/प्रतिनिधी- रामराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय केज येथे सावित्रीबाई फुले जयंती अतीशय उत्साही वातावरणात पार पडली.



या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून माजी मुख्याध्यापक श्री.गोरे तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ.वृषाली गिरी व अश्विनी उगले उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकत त्यांचे विचार मांडले. प्रमुख अतिथी उगले मॅडम यांनी मुलांमध्ये अजूनही मुलीकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलेला दिसत नाही अशी खंत व्यक्त केली. डॉ.वृषाली गिरी यांनी सावित्रीबाईंच्या काळातील सामाजिक परिस्थिती,महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन आणि यासर्व दृष्टीने सावित्रीबाई यांनी खडतर परिस्थितीत केलेले कार्य याबाबत सखोल मार्गदर्शन करत आजच्या काळातही महिलांकडे पाहण्याचा दृष्टिकोन कसा दुषित आहे. आजही समाजात महिला व मुली कशा असुरक्षित आहेत हे मांडत खऱ्याअर्थाने जर महिला मुक्ती दिन साजरा करायचा असेल तर महिला भितीमुक्त होण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे असे आवाहन विद्यार्थ्यांना केले.जर समाजात खऱ्याअर्थाने समानता आणायची असेल तर कायदे करून उपयोगाचे नाही तर मानसिकता बदलली पाहिजे असे मत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप करताना गोरे यांनी महान व्यक्तींच्या जीवन कार्यातून, विचारातून प्रेरणा घेऊन आपल्या जीवनात त्यांचे विचार रुजवायला हवेत असे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नाईकनवरे यांनी केले तर आभार प्रदर्शन देशमुख यांनी केले.

या कार्यक्रमासाठी रामराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील गायकवाड, दांगट, सरवदे, वायबट, देवकते, देशमुख, सोनवणे, शेख, चाळक, शिंपले पवार व सरस्वती प्राथमिक विद्यालयाचे रसाळ, घुले, चाटे, गवळी उपस्थित होते तसेच दोन्ही विद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी मंत्री आमदार अमित देशमुख व वंचितचे युवा नेते सुजात आंबेडकर यांची नालंदा बौद्ध विहारास भेट

लातुर / प्रतिनिधी: - ५ जानेवारी २५ रोजी वंचित बहुजन आघाडीचे युवा नेते सुजात आंबेडकर व माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर शहरातील प्रकाश नगर भागातल्या नालंदा बौद्ध विहार येथे जाउन भगवान गौतम बुद्ध व परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले.



यावेळी बोलताना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, लातुर शहर महानगर पालिका निवडणूकीच्या निमित्ताने आज आपण या ठिकाणी एकत्रित जमलो आहोत. येणाऱ्या काळाचा वेध घेत सुजात आंबेडकर यांची ही आजची भेट ऐतिहासिक ठरेल आणि आपण याचे सार्वजन साक्षीदार आहात ही अभिमानाची बाब आहे. निवडणूक म्हटले की रुसवे फुगवे हे आलेच पण जेव्हा हेतू शुद्ध प्रामाणिक असतो तेव्हा एखादे उद्दिष्टे आपल्याला जेव्हा सध्या करायचे असते तेव्हा त्याग बलिदान द्यायला लागते आणि भगवान गौतम बुद्ध व परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आपण अनुयायी असल्याने आपल्याला हे सांगण्याची आवश्यकता आहे असे वाटत नाही.

लातुर शहर महानगरपालिकेवर काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीचा झेंडा फडकणारच अमित देशमुख लातुर शहर महानगरपालिकेवर काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीचा झेंडा फडकविण्यासाठी आपण एकत्र आलो असून आपला या निवडणुकीत ९० टक्के स्ट्राईक रेट असणार आहे. म्हणजे ७० पैकी ६३ जागा लातुर महानगरपालिकेत आपल्यामुळे निवडून येतील आणि याचा संकल्प आज आपण या ठिकाणी करतो आहे. आज परमपूज्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे वंशज युवा नेते सुजात आंबेडकर आपल्यामध्ये आहेत हे आपल्या सर्वांचे भाग्य आहे. पुढे बोलताना आमदार अमित देशमुख म्हणाले की, आम्हाला आमच्या वाडवडिलांनी जी शिकवण दिली आहे ते आम्ही अजिबात विसरलेले नाहीत. आदरणीय विलासराव देशमुख साहेबांनि नेहमी संविधानाचा सन्मान केला. संविधानाने आपल्याला जे अधिकार दिले याची सुरक्षा व पालन करण्याचे काम त्यांनी केले आणि त्यांनी दिलेली शिकवण यावर आम्ही चालतो आहे. आदरणीय विलासराव देशमुख साहेब आणि आदरणीय बाळासाहेब आंबेडकर यांच्या स्नेहाची आपल्याला कल्पना असून नेहमी आमचे आदराचे स्थान आदरणीय बाळासाहेब आंबेडकर व कुटुंबीय राहिलेले आहेत असे आमदार देशमुख म्हणाले.

सुजात आंबेडकरांना उज्वल भविष्य कालच्या सभेत सुजात आंबेडकर यांनी जे लातुर महानगरपालिका आणि प्रशासकाने केलेला मागील काळातील कारभार यावर भाष्य केले यावरून असेच दिसते की त्याचे भवितव्य अतिशय उज्वल आहे. आणि आपल्याला त्यांच्याकडून विकासाच्या संदर्भात असलेल्या सर्व अपेक्षा साध्य होतील यात शंका नाही असे म्हणत काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीची वैचारिक धार येणाऱ्या काळात अधिक धारदार होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

लातूरला साजेसे परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक

आपल्या जाहीरनाम्यात कांही बाबी सुजात आंबेडकर यांनी कालच्या सभेत सुचविल्या त्या आपण नमुद केल्या असून लवकरच आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला होईल असे सांगत लातुर मधील नालंदा बौद्ध विहार हे एकमेव असे बुद्ध आहे हे जे आदरणीय विलासराव देशमुख साहेबांच्या निधीतून या ठिकाणी आपण साकारू शकलो आहे. या बौद्ध विहाराकडून

आजातागायत उत्तम असे समाजकार्य केले जाते यासाठी लागणारा निधी कधीही कमी पडू दिला नाही यापुढे देखील कमी पडणार नाही असे त्यांनी सांगितले. तसेच लातुर शहरातील मध्यवर्ती ठिकाणी परमपूज्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्यदिव्य स्मारक उभारलं जावं अशी इच्छा आहे तशी चर्चा होते याबाबत आम्ही सुजात आंबेडकर एकत्रित चर्चा करून ते स्मारक कसे असावे याची रुपरेषा ठरवून स्मारक यभे करण्याचा शब्द देत याला विरोधक दृष्ट लावतील ती दृष्ट आपण दोघे मिळून काढू आणि लातूरला साजेसे असे परमपूज्य डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक पूर्ण करण्यासाठी आपण सर्वजण प्रयत्नशील राहू असे त्यांनी सांगितले.

लातुर शहर महानगरपालिकेत महायुतीने जी लूट माजवली आहे. ब्रिटिश काळात जशी मनमानी होती तशी मनमानी मंत्रालय सचिव व मनपातील अधिकारी यांनी प्रशासक काळात केली असून याचा बंदोबस्त काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी कडून आपक्याला करायचा असून ही निवडणूक आपल्याला मिळालेली ही संधी आहे.या संधीचे आपल्याला सोने करायचे आहे आणि एकत्रित येऊन आपल्याला हे काम करायचे असून आपल्या सहकार्याचा सन्मान सर्वांनी राखावा,एकदिलाने आपले उद्दिष्ट प्राप्त करण्यासाठी आणि लातुर शहरातील काँग्रेस व वंचित बहुजन अघाडीच्या सर्व उमेदवाराना प्रचंड आशा बहुमताने विजयी करून लातुर महानगरपालिकेत पाठवावे व आपली सत्ता आणावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

# लातूर ग्रामीणच्या भाजपा कार्यकर्त्यांनी महानगरपालिका निवडणुकीत जिद्दीने कार्यरत राहावे - आ. रमेशआप्पा कराड

लातूर - लातूर महानगरपालिकेवर भाजपाचा झेंडा फडकणार असून या विजयात प्रभाग दहा आणि आकरा मधील सर्व आठही उमेदवार सर्वाधिक मताधिक्याने विजयी व्हावेत यासाठी लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भाजपाच्या कार्यकर्त्यांनी जिद्दीने जोमाने काम करावे असे आव्हान भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.



लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भाजपाचे प्रमुख पदाधिकारी लोकप्रतिनिधी यांची लातूर महानगरपालिका निवडणूक अनुषंगाने भाजपाच्या संवाद कार्यालयात आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीस माजी आमदार ॲड. त्र्यंबकनाना भिसे, माजी नगराध्यक्ष विक्रमसिंह चव्हाण यांच्यासह लातूर मनपा निवडणुकीतील प्रभाग दहा आणि आकरा मधील भाजपाचे उमेदवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

वर्षानुवर्ष निवडून येणाऱ्या काँग्रेसच्या आमदारांनी लातूर शहराच्या विकासासाठी काय केले असा प्रश्न उपस्थित करून या बैठकीत बोलताना आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, केंद्रात आणि राज्यात भाजपाची सत्ता आहे. लातूरात ही भाजपाची सत्ता येणे काळाची गरज असून लातूरच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि विकासासाठी भाजपा शिवाय पर्याय नाही हे मतदारांना पटवून द्यावे.

प्रभाग दहा आणि आकरा हे दोन्ही प्रभाग माझ्यासाठी प्रतिष्ठेचे असून विकासाच्या मुद्द्यावर मते मागून या प्रभागातील दहशत मोडीत काढावी, लातूर शहराच्या प्रगतीत योगदान देणाऱ्या आणि सर्वसामान्यांच्या हिताचे रक्षण करणाऱ्या नगरसेवकांना विजयी करण्यासाठी लातूर ग्रामीण मधील भाजपाच्या कार्यकर्त्यांनी प्रचार यंत्रणेचे सूक्ष्म नियोजन करून मताधिक्य वाढविण्यासाठी मेहनत घ्यावी असेही अव्हान भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले आहे.

या बैठकीत विक्रमसिंह चव्हाण यांनी प्रचार यंत्रणेच्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण सूचना केल्या तर भाजपाच्या उमेदवार सौ. रागीणी यादव आणि हरीओम भगत यांनी प्रभागातील माहिती सांगून प्रचार यंत्रणेत लातूर ग्रामीण मधील भाजपाचे सर्व पदाधिकारी सहभागी होत असल्याबद्दल ऋण व्यक्त केले. बैठकीचे प्रास्ताविक चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी उमेदवार प्रविणकुमार अंबुलगेकर यांनी आभार मानले. या बैठकीस उमेदवार अभिजीत पाटील, धर्मेद्रसिंग चव्हाण, सौ. हेमांगी येळे, सौ. पूजा कांबळे, सौ. पूजाताई चौगुले यांच्यासह भाजपाचे पदाधिकारी नवनाथ भोसले, भागवत सोट, महेंद्र गोडभरले, प्रताप पाटील, शरद दरेकर, सुरज शिंदे, उद्धव काळे, सतीश आंबेकर, गोविंद नरहरे, बन्सी भिसे, साहेबराव मुळे, महादेव मुळे, शामसुंदर वाघमारे, दीपक वांगसकर, विजय काळे, ॲड. मनोज कराड, रवींद्र नागरगोजे, वसंत करमुडे, ललिता कांबळे, सुरेखा पुरी, शीला आचार्य, अच्युत कातळे, अशोक सावंत, ओम चव्हाण, भागवत गीते, प्रभाकर माळी, नारायण राठोड, बाबासाहेब भिसे, भैरवनाथ पिसाळ, विश्वास कावळे, श्रीमंत नागरगोजे, आदिनाथ मुळे, नाना कस्पटे, भाऊसाहेब गुळबिले, सचिन लटपटे, राजकुमार आलापुरे, उत्तम चव्हाण, ज्ञानेश्वर जुगल, उज्वल कांबळे, प्रशांत शिंदे, संजय ठाकूर, लक्ष्मण खलंग्रे, दत्तात्रय सप्ताळ, अहमद शेख, पद्माकर होळकर यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी प्रमुख कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर - ४१३५१२ येथे प्रकाशित केले.